राष्ट्रीय कौशल्य विकास अभियानांतर्गत "उपजिविकेसाठी कौशल्य संपादन व ज्ञान जागरूकता अभियान (The Skill Acquisition & Knowledge Awareness for Livelihood Project-SANKALP)" योजनेंतर्गत केंद्र हिश्याचा निधी वितरीत करण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: कौविउ-२०१९/प्र.क्र.७०/(अभियान-१) कौशल्य-१,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १८ फेब्रुवारी, २०२१

वाचा :

१. सह सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक B-१२०११/४८/२०१५-SDE, दिनांक १५/०९/२०१७.
२. सह सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक F.No.SD-२२/२४/२०१८-IC, दिनांक १२/०२/२०१९.
३. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग/ शासन निर्णय क्र.कौविउ-२०१७/प्र.क्र.१८७/ अभियान-१, दिनांक: ३० ऑगस्ट,२०१९
४. वित्त विभाग /शासन निर्णय क्रमांक:अर्थसं-२०२०/प्र.क्र६५/अर्थ- ३/दिनांक०४/०/०५/२०२०
५. कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक F.No. SD-२१/५९/२०२०-IC, दिनांक २९/०७/२०२०.
६. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र.२०१९/प्र.क्र.७०/ अभियान-१, दिनांक ०२/११/२०२०.
७. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग,शासन निर्णय क्र.२०१९/प्र.क्र.७०/ अभियान-१, दिनांक १२/११/२०२०.
८. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग/शासन निर्णय क्रमांक-२०१९/प्र.क्र.७०/ अभियान-१, दिनांक १७/१२/२०२०.
९. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग/शासन निर्णय क्रमांक-२०१९/प्र.क्र.७०/ कौशल्य-१, दिनांक ०३/०२/२०२१

प्रस्तावना :

केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयामार्फत National Skill Development Mission अंतर्गत, देश व राज्य पातळीवर संस्थात्मक यंत्रणा मजबूत करणे, दर्जेदार प्रशिक्षकांचा समूह तयार करणे, राज्य स्तरावर राबविण्यात येणाऱ्या सर्व कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांचे केंद्रीकरण करणे, कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांचे संनियंत्रण व मूल्यमापन करण्यासाठी प्रभावी यंत्रणा निर्माण करणे, सामाजिकदृष्ट्या मागासवर्गासाठी कौशल्य प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, उत्पादन क्षेत्राकरिता आवश्यक कौशल्ययुक्त मनुष्यबळ निर्माण करणे तसेच मेक इन इंडीया या संकल्पनेस पूरक सहाय्य करणे, या उद्देशांसाठी **"उपजिविकेसाठी कौशल्य संपादन व ज्ञान जागरूकता अभियान (The Skill Acquisition & Knowledge Awareness for Livelihood Project-SANKALP)"** राबविण्यात येत आहे. सदर योजना राज्यात राबविण्यास सं.क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

२. सदरहू योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये केंद्र हिश्याचा रु. २२,०४,४०,०००/- (रु.१६,४८,८९,१२०/-+ रु.३,६५,९३,०४०/-+ रु.१८९,५७,८४०/-) इतका राज्यास प्राप्त झालेला निधी राज्य शासनाच्या एकत्रित निधीत जमा झालेला आहे. या योजनेचा प्रकल्प कालावधी ६ वर्षाचा असून एकुण वार्षिक आराखड्यापैकी रुपये ३६.७४ कोटींचा वार्षिक आराखडा मंजूर आहे. सन २०२०-२१ मध्ये केंद्र हिश्श्याकरीता (६०% प्रमाणे) रु. २२,०५,००,०००/- तर राज्य हिश्याकरीता (४०% प्रमाणे) रुपये १४,७०,००,०००/- इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

३. या पैकी या योजनेंतर्गत केंद्र हिश्याचा सं.क्र.६ अन्वये रु.५,५४,००,०००/- व सं.क्र. ९ अन्वये रु.५,१८,००,०००/- इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर सं.क्र. ८ अन्वये राज्य हिश्याचा रु. ५,१४,००,०००/- इतका निधी सर्वसाधारण घटकाअंतर्गत वितरित करण्यात आलेला आहे. आता, आदिवासी विकास विभाग व वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन रु. १,८९,५७,८४०/- इतका निधी लेखाशिर्ष २२३० ए ३८१ अंतर्गत आदिवासी घटक कार्यक्रमासाठी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

४. राष्ट्रीय कौशल्य विकास अभियानांतर्गत “उपजिविकेसाठी कौशल्य संपादन व ज्ञान जागरूकता अभियान (The Skill Acquisition & Knowledge Awareness for Livelihood Project-SANKALP)” या योजनेंतर्गत केंद्र हिश्याच्या रु.१,८९,५७,८४० /- (अक्षरी रुपये एक कोटी एकोणनव्वद लक्ष सत्तावन्न हजार आठशे चाळीस फक्त ) इतका निधी आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत विनियोग करण्यासाठी लेखाशिर्ष २२३० ए ३८१ अंतर्गत आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांनी सदर निधी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांना उक्त योजनेवर खर्च करण्यासाठी वर्ग करावा. याकरीता आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांना “नियंत्रक अधिकारी” तसेच सहायक संचालक (लेखा) कोकण भवन यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. सदर निधी वितरीत व खर्च करताना आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, मुंबई, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई तसेच सहायक संचालक (लेखा) कोकण भवन, नवी मुंबई यांनी खालील अटी व शर्तीचे पालन होईल, याची दक्षता घ्यावी.

(१) या शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्यात आलेला निधी मागणी क्र. झेडए-२, २२३० कामगार व सेवायोजन (०१) (१५)उपजिविकेसाठी कौशल्य संपादन व ज्ञान जागरूकता अभियान -संकल्प, (केंद्र हिस्सा ६० %, (सर्वसाधारण) (कार्यक्रम), (२२३० ए३८१), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात खर्ची टाकण्यात यावा. तसेच सदर निधी आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत असल्याने तो त्याच घटकासाठी खर्च करण्यात येवून वितरित निधीतून लाभ देण्यात आलेल्या अनूसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांची माहिती आदिवासी विकास विभाग तसेच शासनास उपलब्ध करुन देण्यात यावी.

(२) केंद्र पुरस्कृत उपजिविकेसाठी कौशल्य संपादन व ज्ञान जागरूकता अभियान (The Skill Acquisition & Knowledge Awareness for Livelihood Project-SANKALP)" या योजनेसाठीचा निधी हा केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार खर्च करणे बंधनकारक राहील.

(३) प्रस्तुत योजनेचे लेखे स्वतंत्र ठेवून खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र, लाभार्थ्यांची माहिती व इतर तपशील केंद्र शासनाच्या संबधित मंत्रालयाकडे तसेच शासनाकडे पाठविण्याची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांनी घ्यावी. तसेच सदर लेखे महालेखापाल यांना लेखा तपासणीच्यावेळी उपलब्ध करुन देण्यात यावेत.

(४) सदर निधी खर्च करताना वित्तीय अधिकार नियमांचे तसेच वित्त व नियोजन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, नियम, अटी व शर्तींचे अनुपालन करणे बंधनकारक राहील.

७. प्रस्तुत शासन निर्णय आदिवासी विकास विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक २५७/का-६ दि.०३.०२.२०२१ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ०४/२०२१/व्यय-६, दिनांक २२/०१/२०२१ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२१०२२२१५५०३६१३०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sachin Shamkant Desai

Digitally signed by Sachin Shamkant Desai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development and Entrepreneurship Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cc72ac8e24d61d7cf89d14c68f5987ede605ac1176d98647cf1bb44681444917, cn=Sachin Shamkant Desai
Date: 2021.02.22 15:57:01 +05'30'

**( सचिन देसाई )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र राज्य**

**प्रत :-**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
६. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
७. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, कोकण भवन, मुंबई.
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
११. सहायक संचालक (लेखा), कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, मुंबई.
१२. कोषागार कार्यालय, मुंबई/नवी मुंबई.
१३. महालेखापाल कार्यालय, मुंबई/नागपूर.
१४. सह सचिव/उप सचिव/अवर सचिव कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय मुंबई.
१५. सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती (कौशल्य-१).